# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१३ मार्च, २०२०


☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# स्थानीक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही २८ लक्ष ३० हजार ५५० रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०३/२०२० रोजी रात्रौ दरम्यान स्थानीक गुन्हे शाखा चंद्रपुर येथील पथकास गोपणीय माहीती मिळाली की येनबोडी ते मानोरा येणारे रस्त्याने ट्रक क्रं. एमएच ३४ बिजी ४९३६ व एका विटारा ब्रिझा कारमध्ये अवैद्यरीत्या दारुची वाहतुक होत आहे. अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी हे पोस्टे बल्लारशा हद्दीमध्ये येनबोडी ते मानोरा मौजा भडकाम गावाजवळ रोडवर दबा धरुन बसले. काहीवेळातच पथकांस मिळालेल्या माहीतीप्रमाणे विटारा ब्रिझा कार व एक मिनी ट्रक पोलीसांना येताना दिसताच त्यास थांबवुन अवैध दारूबाबत झडती घेतली असता नमुद ट्रकमध्ये १) ५९ खरड्याचे खोक्यात एकुण ५,९०० नग ९० मिली नी भरलेल्या रॉकेट देशी दारूच्या शिश्या किं. ५,९०,०००/—रु., २) ०१ खरड्याचे खोक्यात एकुण ४८ नग १८०मिली नी भरलेल्या रॉकेट देशी दारूच्या शिश्या किं. ९,६००/—रु., ३) दारू वाहतुकी करीता वापरलेला अशोक लेलॅन्ड कपनीचा १२१४ मॉडेल विटकरी रंगाचा मिनी ट्रक क्रं. एमएच ३४ बिजी ४९३६ त्याची किमंत १५,००,०००/—रु ४) दारु वाहतुकी करीता वापरलेली कथीया रंगाची मारुती विटारा ब्रिझा कार क्रं. एमएच ३४ बिएफ ९८४१ त्याची किमंत ७,००,०००/—रु

५) चार आरोपीकडुन एकुन पाच मोबाईल त्याची किं. ३००००/—रु.व नगदी ९५०/—रु. **असा एकुण २८,३०,५५०/—रु.** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीं नामे १) गौरव लक्ष्मण बंडीवार वय २४ वर्ष रा. सम्राटनगर नांदा फाटा २) नविन पिरया मल्लारपू वय २९ वर्ष रा. नांदाफाटा ३) मोईनिद्दीन फैजुद्दीन सिध्दीकी वय ३० वर्ष रा. नांदाफाटा ४) सुरेश धनपाल मलेकोरवन वय ३४ वर्ष रा. नांदाफाटा याचे विरूध्द पो.स्टे. बल्लारशा अप क्र. २६४/२०२० कलम ६५(अ), ८३ म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढील तपास बल्लारशाह पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक स्थानीक गुन्हे शाखा चंद्रपुर श्री. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि विकास मुंढे, नापोशि महेंद्र भुजाडे/१०२४,नापोशि अविनाश दशमवार/१९६३, पोशि संजय वाढई/२४३५, जावेद सिध्दीकी/२५३२, कुंदन बावरी/२९४९ या पोलीस पथकाने पार पाडली.

———————————————————————————————————